MHND100001442026

## **(निशाणी १ वरील आदेश )**

(दिनांक २४ माहे मार्च, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ऐक्ट, १८२७ चे कलम viii नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार १ ते ८ हे आपसात सख्खे भाऊ-बहिण आहेत. अर्जदार क्र. १ ते ८ यांची आई सरसाबाई भ्र. भाऊराव जाधव ह्या दिनांक २१.०१.२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच अर्जदाराचे वडील भाऊराव पि. रावण जाधव हे यापूर्वीच मयत झाले आहेत. अर्जदारांव्यतिरिक्त मयत सरसाबाई भ्र. भाऊराव जाधव यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३. बॉम्बे रेग्युलेशन ऐक्ट १८२७ चे नियम २ नुसार वारस प्रमाणपत्र देतांना अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर बॉम्बे रेग्युलेशन ऐक्टचे वाचन केल्यानंतर मी निष्कर्षास आलो आहे की, सदर नियमाअंतर्गत वारस प्रमाणपत्र देणे म्हणजे वारस, इच्छापत्र व व्यवस्थापक इत्यादींना औपचारिक मान्यता देणे होय.

४. अर्जदारांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ मयत सरसाबाई भ्र. भाऊराव जाधव यांची मृत्यू प्रमाणपत्राची प्रत (निशाणी १२), अर्जदारांचे पडताळणी केलेले आधारकार्डच्या

प्रती (निशाणी १३ ते २०) व दि.१९.०२.२०२६ रोजीचे 'दैनिक वतनवाला' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीसची मुळ प्रत (निशाणी २१) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

५. अर्जदार क्र.१ कोंडीबा पि. भाऊराव जाधव याने त्याचे पुरावा शपथपत्र (निशाणी ११) अभिलेखावर दाखल केले असून त्याचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'दैनिक वतनवाला' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन (निशाणी २१) प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली परंतु कोणताही आक्षेप आला नाही. अर्जदार क्र. १ ते ८ ही मुले या नात्याने मयत सरसाबाई भ्र. भाऊराव जाधव यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे -

<u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्र.१ कोंडीबा पि. भाऊराव जाधव, २. रावण पि. भाऊराव जाधव, ३. हारी पि. भाऊराव जाधव, ४. केशव पि. भाऊराव जाधव, ५. गिरजाबाई भ्र. लक्ष्मण गायकवाड, ६. सुंदरबाई भ्र. मारोती गायकवाड, ७. रेणूकाबाई भ्र. सदाशिव टर्के आणि अर्जदार क्र.८ शांता भ्र. नारायण कंधारे हे मयत सरसाबाई भ्र. भाऊराव जाधव यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE

Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.03.24 16:38:26 +0530

(के. एस. खंडारे)
सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार

दि.२४.०३.२०२६

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file judgment/order are same word to word, as per the original Judgment/order.

Name of the Stenographer :- Mrs J P Ghogare

Court Name :- In the Court of Jt C.J.J.D, Kandhar

Date of the judgment/order :- 24.03.2026

Judgment/order signed by the presiding officer on :- 24.03.2026

Judgment/order uploaded on :- 24.03.2026